नियमीत दिवाणी मुकदमा क्रमांक ३५/२०१३ मधील निशाण ६१ वरील आदेश

१. वादी यांनी हा अर्ज दावा मिळकतीमध्ये वादी कूळ आहेत किंवा कसे, याबाबतचा मुद्दा काढणेबाबत व तो मुद्दा महाराष्ट्र कूळ व शेत जमीन अधिनियम, १९४८ चे कलम ८५ नुसार अंतिमतः निकाल होणेसाठी मे.तहसिलदार, लांजा यांचेकडे पाठविणेबाबत आदेश होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांनी या अर्जावर म्हणणे दाखल करुन वादी यांचा हा अर्ज स्पष्ट शब्दात नाकारला आहे.

३. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये त्यांचे दावा मिळकतीमध्ये कूळपणाचा हक्क असल्याचे नमूद केले आहे. प्रतिवादी यांनी कैफियत देऊन वादीचा कूळपणाचा हक्क नाकारला आहे. त्यामुळे, दावा मिळकतीमध्ये वादी कूळ आहे अगर कसे, याबाबतचा मुद्दा काढणेत येऊन तो मुद्दा निकाल होणेकरीता मे.तहसिलदार, लांजा यांचेकडे पाठविण्यात यावा, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. प्रतिवादी यांचे म्हणण्याचे कथनांप्रमाणे वादीचा हा दावा निरंतर मनाई करीता आहे. त्यामुळे, त्या दाव्यात कूळपणाचा मुद्दा काढता येणार नाही. वादीने दावा परिच्छेद क्रमांक ४ मध्ये दावा मिळकत खरेदी केल्याचे कथन केले आहे. त्यामुळे, वादी यांना दावा मिळकती संदर्भात नेमका कोणता हक्क सांगणेचा आहे, याबाबत संभ्रमावस्था आहे. अशा परिस्थितीत कूळ पणाचा मुद्दा कायदयाने काढता येणार नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा,अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

५. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

६. वादीतर्फे विधीज्ञ श्री.जी.एस.खानविलकर व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.एन.के.चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला.

७. अर्जातील व म्हणण्यातील परस्पर विरोधी कथनांच्या अनुषंगाने व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील कारण मिमांसेसहीत निष्कर्ष खालील प्रमाणेः-

| मुद्दे | निष्कर्ष. |
|---|---|
| १. वादी मागणी करतात त्याप्रमाणे कूळपणाचा मुद्दा काढणे व तो मुद्दा निकालासाठी मे.तहसिलदार, लांजा यांचेकडे पाठविणे आवश्यक आहे, हे वादी शाबीत करतात काय? | .....................नाही. |

२.काय आदेश ? ............ अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

कारण मिमांसा

मुद्दा क्रमांक १ बाबतः-

८. अभिलेखातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांनी हा दावा प्रतिवादी यांनी दावा मिळकत त्रयस्थ व्यक्तीस विल्हा करु नये व दावा मिळकतीतील वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये, अशी निरंतरची ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे.

९. वादी यांनी त्यांचे दाव्यातील परिच्छेद क्रमांक ४ मध्ये त्यांचे पूर्वज दावा मिळकतीमध्ये कूळ असल्याचे व दावा मिळकतीच्या सातबारा सदरी सन १९५५-५६ साली वादीचे पूर्वज यांचे नाव कूळ म्हणून नमूद झाल्याचे कथन केले आहे. परंतु, वादी यांनी याच परिच्छेदामध्ये पुढे " वादी यांचे मूळ पुरुष कै. श्री. गणपत बाबाजी खानविलकर यांची दावा मिळकतीमध्ये कूळ म्हणून प्रत्यक्ष कब्जे वहिवाट असलेनेच, जमीन मिळकतीचे मूळ मालक श्री. लक्ष्मण अंतू तेली उर्फ लांजेकर यांनी त्यांना असणा-या आर्थिक अडचणीस्तव दिनांक ०४/१०/१९६०साली जमीन मिळकत श्री. गणपत बाबाजी खानविलकर यांना रक्कम रु. ३०० ला खरेदी म्हणून दिली असून, खरेतर सदरचे दस्तातुन श्री. लक्ष्मण अंतु तेली उर्फ लांजेकर यांनी वादी यांचे कुटूंबांचा कूळपणाचा हक्क मान्य केला आहे व सदरचे दस्ता नंतर वादी यांनी प्रतिवादी यांना खंड देणेचा प्रश्नच निर्माण झालेला नाही," असे कथन केले आहे. वादी यांनी केलेले हे कथन पाहता वादी यांचे पूर्वजांनी दावा मिळकत सन १९६० साली कथन केल्याचे व त्यामुळे खंड देण्याचा प्रश्न निर्माण झाला नसल्याचे कथन केले आहे. यावरुन वादी यांचे दाव्यामध्ये एका ठिकाणी दावा मिळकतीमध्ये कूळ पणाचा हक्क असल्याचे व त्यानंतर दुस-या ठिकाणी मालकी हक्क असल्याचे कथन करीत आहे. वादी यांनी त्यांचे दाव्यामध्ये दावा मिळकतीमध्ये त्यांना मालकी हक्क प्राप्त झाल्याचे कथन केले असल्यामुळे पुन्हा त्यांना कूळ पणाचा आहे किंवा कसे, हे ठरविणे या दाव्याचे कामी आवश्यक व जरुरीचे नाही.

१०. वादीतर्फे विधीज्ञ श्री. खानविलकर यांनी या कामी सरस्वतीबाई त्र्यंबक गायकवाड विरुध्द दामोदर डी.मोतीवाले आणि इतर, २००२ *(५)* बॉम्बे सी.आर.१८२ या न्यायतत्वाचा आधार घेतला. या न्याय निर्णयामध्ये मा. नाम. सर्वोच्य न्यायालय यांनी असे अधोरेखित केले आहे की, "मिळकतीमध्ये एखादा व्यक्ती कूळ आहे किंवा कसे, व त्याला मिळकत खरेदी करणेचा हक्क आहे किंवा कसे, हे

ठरविणेचा संपूर्ण अधिकार आहे. महाराष्ट्र कूळ व शेत जमीन अधिनियम, १९४८ अंतर्गत प्राधिकरणाला आहे. दिवाणी न्यायालयाला तशा वाद प्रश्नाबाबत निर्णय देण्याचा अधिकार नाही."

११. या प्रकरणी वादीने निव्वळ निरंतर मनाईची दाद मागितलेली आहे. वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये त्यांचा त्यांचा कब्जा असल्याचे परस्पर विरोधी कथने करीत आहेत. या कामी वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान उपस्थित झालेला वाद पाहता वादी व प्रतिवादी यांचेपैकी दावा मिळकतीमध्ये नेमका कोणाचा कब्जा आहे, हे या दाव्याचे कामी तपासणे आवश्यक आहे. या दाव्याचे कामी वादी हे दावा मिळकतीमध्ये कूळ आहेत किंवा कसे, हे ठरविण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे, वादी यांनी वर नमूद ज्या न्यायतत्वाचा आधार घेतला, ते न्यायतत्व या कामी लागू होत नाही. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असलेला वाद पाहता वादी कथन करतात त्याप्रमाणे कूळ पणाचा मुद्दा निश्चित करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकाराथीर् देत आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u>

१२. वर नमूद मुद्दा क्रमांक १ बाबत केलेल्या विवेचनावरुन मी खालील आदेश पारित करीत आहे.

<u>आ दे श</u>

वादी यांचा निशाण ६१ वरील अर्ज नामंजूर करणे येत आहे.

दिनांकः ०८/०८/२०१७.
ठिकाणः लांजा.

(डी.एम.हिंग्लजकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्त.लांजा,
जि.रत्नागिरी.